# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्यापोटकलम(२)अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५

फोन नंबर ०७१३२—२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/७९७ /२०२० दि. ०६/०२/२०२०

अतितात्काळ/महत्त्वाचे

## परिपत्रक

विषय:— दुष्काळ परिस्थिती तसेच ''क्यार ''व ''महा'' चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील योतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ:— मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपुर यांचे पत्र क्र. तशिस/प्राकाना /शैवि—१/फी माफी/२०२०/४७९, दिनांक ०३/०२/२०२०.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालयांना तथा प्राचार्यांना कळविण्यात येते की, राज्यात माहे आक्टोंबर, नोव्हेंबर २०१९ मध्ये ''क्यार'' व ''महा'' चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्हातील ३२५ तालुक्यामध्ये शेती पिकांचे व बहुवार्षिक पिकाचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफी संदर्भात माहिती संदर्भीय पत्रासोबत असलेल्या विवरण पत्रात दि. ६/२/२०२० रोजी ५.०० वाजेपर्यंत न चुकता मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या coegondwana@gmail.com या ई—मेल आयडीवर पाठविण्यात यावे. सदर माहिती प्राप्त न झाल्यास व विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील, यांची नोंद घ्यावी.

6/2/2020

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विवरण पत्र –अ

### दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | विभाग | दुषकाळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची संख्या | दुषकाळग्रस्त भागातील हिवाळी -२०१९ परीक्षेकरीता अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात प्रतिपूर्ती करण्यात आलेली रक्कम रुपये | दुषकाळग्रस्त भागातील उन्हाळी -२०१९ परीक्षेकरीता अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात प्रतिपूर्ती करण्यात आलेली रक्कम रुपये | प्रतिपूर्तीची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

## विवरण पत्र –ब

### क्यार व महा चक्रीवादळामुळे आपदग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र

| अ. क्र. | विभाग | आपदग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची संख्या | आपदग्रस्त भागातील हिवाळी -२०१९ परीक्षेकरीता अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात प्रतिपूर्ती करण्यात आलेली रक्कम रुपये | आपदग्रस्त भागातील उन्हाळी -२०१९ परीक्षेकरीता अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्षात प्रतिपूर्ती करण्यात आलेली रक्कम रुपये | प्रतिपूर्तीची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266
E-mail : ronagpur.dte@gmail.com Website: rdtenagpur.org.in

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/फी माफी/2020/ 479
दिनांक:- 3 FEB 2020

प्रति,

कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर

विषय:- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/2020/63, दि. 03/02/2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, पर्जन्यतूट व अनुषंगिक बाबींमुळे प्रभावित झालेल्या आंबेजागाई, जि. बीड व परांडा, जि. उस्मानाबाद या दोन तालुक्यामधील दुष्काळी परिस्थिती तसेच राज्या माहे ऑक्टोबर नोव्हेंबर 2019 मध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे, झालेल्या अवेळी पावसांमुळे राज्यातील 34 जिल्हातील 325 तालुक्यामध्ये शेती पिकांचे व बहुवार्षिक पिकाचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफी संदर्भात माहिती **संदर्भिय पत्रासोबत असलेल्या विवरणपत्रात दि. 05/02/2020 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत** या कार्यालयास न चुकता सादर करावी.

**सहपत्र:-** संदर्भिय पत्र

(डॉ. राम निबुदे)
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

**प्रत:-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

MS B Dupare, OS

C:\Meshram Degree\Letters\Letter to University.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे/स्मरणपत्र

क्रमांक : २अ/एडीएम/२०२०/ ६१३
दिनांक : 3 FEB 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर

विषय : दुष्काळ परिस्थिती तसेच " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/८६४, दि.२९/११/२०१९

वरील विषयाबाबतचे संदर्भाधिन पत्र व त्यासोबतची सहपत्रे पहावीत.सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार पर्जन्यतूट व अनुषंगिक बाबींमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई , जि.बीड व परांडा, जि उस्मानाबाद या दोन तालुक्यांमधील दुष्काळी परिस्थिती तसेच राज्यात माहे ऑक्टोबर नोव्हेंबर २०१९ मध्ये " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे निर्माण परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि आपल्या विभागाचा अनुपालन अहवाल अद्यापपावेतो या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. तरी सदरचा अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरुन या कार्यालयास दि.०५.०२.२०२० पर्यन्त पाठविण्यात यावा.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. मा.सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
२. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी
३. कार्यासन क्रमांक २,३,१०,१८ मुख्य कार्यालय मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी